# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-** विभागातील अधिकारी/कर्मचारी यांना त्यांचे कार्यकुशलतेमध्ये भर
**{अग्निशमन विभाग}** पडण्याकरीता त्यांना महाराष्ट्र राज्य प्राथमिक प्रशिक्षण केंद्र, मुंबई (SFTC), राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपुर (NFSC), व राष्ट्रीय नागरीक सुरक्षा महाविद्यालय, नागपुर (NCDC) येथे वेगवेगळया प्रशिक्षणाकरीता पाठविले जातात.

उपरोक्त शासकीय संस्थेमध्ये अधिकारी/कर्मचारी यांना वेगवेगळया पाठयक्रमाचे प्रशिक्षादरम्यान येणारा खर्च कर्मचारी करेल असे म.न.पा. मंजुर ठराव क्र. ६३ दि. २५/०३/२०२१ प्रमाणे धोरण निश्चित आहे.

राज्यातील इतर महानगरपालिका जसे : बृहन्मुंबई महानगरपालिका, ठाणे महानगरपालिका, नाशिक महानगरपालिका, पिंपळी चिंचवड महानगरपालिका अधिकारी/कर्मचारी यांना अग्निशमन पाठयक्रमाचे वेगवेगळया प्रशिक्षणाकरीता पाठविल्यानंतर यादरम्यान येणारा संपुर्ण खर्च तेथील महानगरपालिका वहन करतात. असे धोरण आहे.

अग्निशमन विभागाची कार्यप्रणाली ही अत्यंत जोखिम स्वरुपाची असते. एखादी दुर्घटना घडली असता कर्मचारी आपला जीव धोक्यात टाकुन कार्यकुशलतेचा परीचय देवून अग्निशमन व रेस्क्यु कार्य करीत असतो. कर्मचाऱ्यांमध्ये कार्यकुशलता त्याला प्रशिक्षणाच्या माध्यमातुन प्राप्त होत असते. सदर प्रशिक्षण कर्मचाऱ्याचे स्वयंसुरक्षा तथा लोकसेवेकरीता आहे. त्यामुळे प्रशिक्षणादरम्यान येणारा हा खर्च हा कर्मचारी वहन करेल ही बाब कर्मचाऱ्यासोबत न्यायसंगत नाही.

करिता विभागातील अधिकारी/कर्मचारी यांना महाराष्ट्र राज्य प्राथमिक प्रशिक्षण केंद्र, मुंबई (SFTC), राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपुर(NFSC), व राष्ट्रीय नागरीक सुरक्षा महाविद्यालय, नागपुर (NCDC) येथे वेगवेगळया प्रशिक्षणाकरीता पाठविल्यानंतर या दरम्यान येणारा संपुर्ण खर्च (रु. ८०,००० ते ९०,००० पर्यत मर्यादा) म.न.पा. वहन करेल तथापि अशाप्रकारचे प्रशिक्षणाकरिता मा. आयुक्त यांची मान्यता आवश्यक राहील. या धोरण निश्चितेच्या विषयास विचारात घेवुन मान्य करुन घेणे.

टिप:- सविस्तर माहिती नस्तीत संलग्न.

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक :- 08/मनपा/प्रशासक** **दिनांक :- 15/12/2023**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मुख्य अग्निशमन अधिकारी, अग्निशमन व आपत्कालीन सेवा विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार विभागातील अधिकारी/कर्मचारी यांना त्यांचे कार्यकुशलतेमध्ये भर पडण्याकरीता त्यांना महाराष्ट्र राज्य प्राथमिक प्रशिक्षण केंद्र, मुंबई (SFTC), राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपुर (NFSC), व राष्ट्रीय नागरीक सुरक्षा महाविद्यालय, नागपुर (NCDC) येथे वेगवेगळया प्रशिक्षणाकरीता पाठविले जातात.

उपरोक्त शासकीय संस्थेमध्ये अधिकारी/कर्मचारी यांना वेगवेगळया पाठयक्रमाचे प्रशिक्षादरम्यान येणारा खर्च कर्मचारी करेल असे म.न.पा. मंजुर ठराव क्र. ६३ दि. २५/०३/२०२१ प्रमाणे धोरण निश्चित आहे.

राज्यातील इतर महानगरपालिका जसे : बृहन्मुंबई महानगरपालिका, ठाणे महानगरपालिका, नाशिक महानगरपालिका, पिंपळी चिंचवड महानगरपालिका अधिकारी/कर्मचारी यांना अग्निशमन पाठयक्रमाचे वेगवेगळया प्रशिक्षणाकरीता पाठविल्यानंतर यादरम्यान येणारा संपुर्ण खर्च तेथील महानगरपालिका वहन करतात. असे धोरण आहे.

अग्निशमन विभागाची कार्यप्रणाली ही अत्यंत जोखिम स्वरुपाची असते. एखादी दुर्घटना घडली असता कर्मचारी आपला जीव धोक्यात टाकुन कार्यकुशलतेचा परीचय देवून अग्निशमन व रेस्क्यु कार्य करीत असतो. कर्मचाऱ्यांमध्ये कार्यकुशलता त्याला प्रशिक्षणाच्या माध्यमातुन प्राप्त होत असते. सदर प्रशिक्षण कर्मचाऱ्याचे स्वयंसुरक्षा तथा लोकसेवेकरीता आहे. त्यामुळे प्रशिक्षणादरम्यान येणारा हा खर्च हा कर्मचारी वहन करेल ही बाब कर्मचाऱ्यासोबत न्यायसंगत नाही.

करिता विभागातील अधिकारी/कर्मचारी यांना महाराष्ट्र राज्य प्राथमिक प्रशिक्षण केंद्र, मुंबई (SFTC), राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपुर(NFSC), व राष्ट्रीय नागरीक सुरक्षा महाविद्यालय, नागपुर (NCDC) येथे वेगवेगळया प्रशिक्षणाकरीता पाठविल्यानंतर या दरम्यान येणारा संपुर्ण खर्च (रु. ८०,००० ते ९०,००० पर्यत मर्यादा) म.न.पा. वहन करेल तथापि अशाप्रकारचे प्रशिक्षणाकरिता मा. आयुक्त यांची मान्यता आवश्यक राहील. या धोरण निश्चितेच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**डॉ. अभिजीत चौधरी (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**